# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.

E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : १०/एनजीपी/नवीन संस्था/मान्यता/२०१९/ ७२९

दिनांक : 28 2019

प्रति,

प्राचार्य,

अल अमीन एज्युकेशनल ॲन्ड मेडीकल फौंडेशनचे,

डिलाईट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी,

शरद कॅम्पस, पिंपळे जगताप रोड,

पो. कोरेगाव भिमा, ता. शिरुर,

जि. पुणे-४१२२१६.

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्याबाबत.

संदर्भ :१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र. वेस्टर्न/२०१९-२०/१-५००८६६७६०१ दि. १० जुन, २०१९.

२. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. मान्यता-२०१९/(प्र.क्र.१०९/१९)तांशि-५, दि. २५ जून, २०१९.

उपरोक्त विषयासंदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना-अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था खाली दर्शविलेल्या प्रवेशक्षमतेसह सुरु करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | डी.फार्मसी | ६० |

आपल्या संस्थेने शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी व इतर अटी यांचे पालन करण्याबाबत नोंदणीकृत हमीपत्र प्रपत्र "अ" व "ब" या संचालनालयास सादर केलेले आहे. आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास नियतठेव म्हणून रु. ७.५० लाख खाते क्र. ५०३००३४४८१३८४९, दि. २६.६.२०१९ अन्वये, एचडीएफसी बँक, शाखा- शिक्रापूर, येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. तसेच द्वितीय वर्षासाठी रु.७.५० लाख १० वर्षे मुदतीसाठी संयुक्त खात्यात जमा करुन सदर मुदत ठेवींची मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

संदर्भांकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्तीसह खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

AAEMF Delight Institute of Pharmacy MSBTE-1954 DTE-6